मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# एका वर्षात अडीच हजार श्वानांचा मृत्यू

## नेहरुनगर येथील प्राणी शुश्रूषा केंद्रात आता मोठ्या प्राण्यांसाठीही दहनयंत्राची सोय : नागरिकांची गैरसोय टळणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या नेहरुनगर येथील प्राणी शुश्रूषा केंद्रात आता मोठ्या प्राण्यांसाठीही दहनयंत्राची सोय करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टळणार आहे. दरम्यान, एका वर्षात अडीच हजार श्वानांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.



पिंपरी-नेहरूनगर येथे महापालिकेच्या वतीने शहरात प्राणी शुश्रूषा केंद्रात (ॲनिमल शेल्टर हाऊस) भटक्या आणि पाळीव प्राण्यांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्राणी शुश्रूषा केंद्राच्या माध्यमातून पाळीव, भटक्या श्वानांना उपचार दिले जातात. याच ठिकाणी श्वानांसाठी दहन यंत्र बसविण्यात आले आहे. मात्र, मोठ्या प्राण्यांसाठी अशी यंत्रणा उपलब्ध नव्हती. त्यामुळे ते प्राणी पुण्यातील दहनयंत्रामध्ये पाठविण्यात येत होते. मात्र, आता शहरातील मोठ्या प्राण्यांसाठी दहनयंत्राची सोय करण्यात आली आहे. मोठ्या पाळीव प्राण्यांसाठीचे दहन मशीन बसविण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टळणार आहे. या मशीनमध्ये दहनासाठी प्राण्यांच्या वजनानुसार वेळ लागणार आहे. साधारण तीन तासांत मोठ्या प्राण्याचे दहन होईल, असे पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

### एका वर्षात अडीच हजार श्वानांचे दहन

२०२३ मे ते एप्रिल २०२४ पर्यंत दोन हजार ५८० श्वानांचे दहन करण्यात आले. यामध्ये पाळीव आणि रस्त्यावरील श्वानांचा समावेश आहे. मे २०२३ मध्ये यंत्रामध्ये बिघाड झाल्याने श्वानांसाठीचे नवीन यंत्र बसविण्यात आले होते.

### दरमहा 40 प्राण्यांचे दहन

» शहरात पाळीव प्राण्यांची संख्या लक्षणीय आहे. दर महिन्याला साधारण ३५ ते ४० मोठे प्राणी दहनासाठी येतात. त्यामुळे ही संख्या मोठी असून शहरात अद्ययावत यंत्राची आवश्यकता होती. पाळीव प्राण्यांमध्ये गाय, म्हैस, बैल, घोडा या प्राण्यांसाठीदेखील दहन यंत्र असावे, अशी नागरिकांची मागणी होती. त्यानुसार अद्ययावत आणि पर्यावरणपूरक यंत्र बसविण्यात आले आहे. हे मशीन सीएनजी गॅसवर चालते.

“ मोठ्या पाळीव प्राण्यांसाठीचे दहन यंत्र बसविण्यात आले आहे. त्याची चाचणी सुरू आहे. येत्या काही दिवसांत मोठ्या प्राण्यांचे दहन सुरू करण्यात येणार आहे.

**- डॉ. अरूण दगडे, पशुवैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# पावसाळापूर्व कामांसाठी आमदार लांडगेंची ‘टीम’ मैदानात

## प्रभागनिहाय महापालिका अधिकाऱ्यांसोबत पाहणी : आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशासन अन् पदाधिकारी सतर्क

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील भोसरी विधानसभा मतदार संघात पावसाळा पूर्व कामे मार्गी लावण्यासाठी तसेच, आपत्ती व्यवस्थान व नियोजन अचूक करण्यासाठी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांची ‘टीम’ महापालिका प्रशासनासोबत मैदानात उतरली आहे.

मुंबई-घाटकोपर येथे वादळी पावसामुळे होर्डिंग कोसळून १८ नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच पिंपरी-चिंचवडमध्ये मोशी येथील जयगणेश साम्राज्य चौकात होर्डिंग कोसळले. सुदैवाने या दुर्घटनेमध्ये कोणतीही जीवित हानी झालेली नाही. मात्र, पावसाळापूर्व कामे आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग सज्ज करण्यासाठी आमदार लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.



भोसरी विधानसभा मतदार संघातील सर्वसामान्य नागरिकांसाठी आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने ‘परिवर्तन हेल्पलाईन-93799 09090’ सुविधा सुरू आहे. सार्वजनिक जनहिताच्या दृष्टीने नागरी समस्या सोडवण्यासाठी ‘परिवर्तन’चे स्वयंसेवक प्रभागनिहाय काम करीत आहेत.

महापालिका क्षेत्रीय कार्यालय आणि परिवर्तनचे स्वयंसेवक यांच्या माध्यमातून परिसरातील नाले, ओढे आणि पाणी साचणाची शक्यता असलेल्या ठिकाणांची पाहणी करण्यात येत आहे. तसेच, मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यास जनजीवन विस्कळीत होणार नाही. तसेच, वीज वाहिन्या तुटणे किंवा वृक्ष कोसळणे अशा घटना झाल्यास आपत्ती व्यवस्थान विभाग, अग्निशमन विभाग तसेच आरोग्य विभागाच्या माध्यमातून कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात. या करिता आढावा घेतला जात आहे, अशी माहिती ‘परिवर्तन’चे समन्वयक ऋषभ खरात यांनी दिली.

“ मुंबई- घाटकोपरमध्ये होर्डिंग दुर्घटना घडली आहे. गेल्यावर्षी किवळेतील होर्डिंग दुर्घटनेमध्ये ५ नागरिकांना जीव गमवावा लागला. शहरातील होर्डिंगचे ऑडिट करावे, अशी मागणी आम्ही केली होती. त्यावर प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे. आता पावसाळापूर्व कामे मार्गी लावावी आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे. या भूमिकेतून केवळ प्रशासनावर अवलंबून न राहाता आम्ही ‘परिवर्तन हेल्पलाईन’च्या माध्यमातून प्रभागनिहाय काम करीत आहोत. प्रशासन आणि आम्ही लोकप्रतिनिधी एकत्रित सकारात्मक भूमिकेतून काम केले, तर निश्चितपणे नागरिकांना चांगल्या सुविधा आणि सेवा देता येईल, असा विश्वास आहे.

**– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# होर्डिंगवरील कारवाई होल्डिंगवर

## महापालिकेकडून शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई : फुरसुंगी-उरुळी देवाची परिसरात 84 अनधिकृत होर्डींग

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबईतील होर्डींग (जाहिरात फलक) दुर्घटनेनंतर पुणे महापालिकेकडून शहरातील अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई केली जात आहे. पालिकेने शहरात घेतलेल्या आढाव्यात हडपसर भागातील फुरसुंगी-उरुळी देवाची परिसरात ८४ जाहिरात फलक अनधिकृत असल्याची माहिती समोर आली आहे.




परंतु, या दोन गावांसाठी स्वंतत्र नगरपरिषदेची घोषणा करण्यात आल्याचे करण देत महापालिकेने या जाहिरात फलकांवर कारवाईच केलेली नाही. यातील अनेक होर्डिग सासवड रस्ता तसेच फुरसुंगी ते मंतरवाडी रस्त्यावर आहेत.

या रस्त्यावर दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. दरम्यान, अद्याप ही गावे महापालिकेतच असल्याचे राज्यशासनाने न्यायालयात सांगितल्यानंतर महापालिकेकडूनच या गावांचा कारभार पाहिला जात असताना प्रशासनाने अनधिकृत होर्डिंगवरील कारवाइ होल्डिंगवर का ठेवली आहे, असा प्रश्न उपस्थित होत असून पालिका या परिसरात दूर्घटना घडण्याची वाट पाहातय आहे का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

**मोठ्या होर्डिंचा धोका...**

महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, यातील काही जाहिरातीचे होर्डिंग ही गावे महापालिकेत येण्यापूर्वी लावलेली आहेत तर काही फलक गावे महापालिकेत आल्यानंतर रातोरात उभारलेली आहेत. गावे पालिकेत आल्याने ती अधिकृत होतील, असा समज करूल ती उभारण्यात आलेली आहेत.

मात्र, त्यांचा आकार महापालिकेच्या निश्चित केलेल्या नियमावलीतील तरतूदीपेक्षा मोठा आहे, तसेच वर्षानुवर्षे त्याचे कोणतेही स्ट्रक्चरल ऑडीट झालेले नाही. मात्र, यातील जाहिरात फलकांचे मालक कोण याची कोणतीही नोंद पालिकेच्या दप्तरी नाही.

त्यामुळे अशा धोकादायक होर्डिंगबाबत कागद नाचवित त्यावर कारवाई करण्यास मात्र पालिका तयार नाही. यातून दररोज ये-जा करणाऱ्या हजारो प्रवाशांच्या जीवाला यामुळे धोका निर्माण झाला आहे.

**हडपसरचे सहाय्यक आयुक्त म्हणतात..**

महापालिकेच्या आकाश चिन्ह विभागानुसार या गावांमध्ये एकूण ८४ होर्डिंग्स असल्याचे तसेच महापालिका, पीएमआरडीए प्रशासन अशा कोणत्याही प्रशासनाची परवानगी घेतलेली नाही. महापालिकेत समावेश होण्यापूर्वी होर्डिंग मालकांकडे जुन्या ग्रामपंचायतीची परवानगी आहे.

कारवाइ करताना या परवानगीचा कागद पुढे केली जातो, त्यातच महापालिका की नगरपरिषद असा वाद असल्याने अशा होर्डिंगवरील कारवाइ रेंगाळलीच आहे. त्यांना पीएमसीकडून परवानगी घेण्यास सांगितले असतानाही ठराविक होर्डिंग मालकांनीच ती प्रक्रिया पूर्ण केली असल्याचे हडपसर प्रभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त बाळासाहेब ढवळे यांनी सांगितले.

**जबाबदारी कोणाची?**

» फुरसुंगी आणि उरूळीदेवाची ही गावे पीएमआरडीएच्या हद्दीत होती. त्यानंतर ती आता पालिकेच्या हद्दीत आहेत, तर शासन त्यांच्यासाठी स्वतंत्र नगरपालिका करणार आहे. त्यामुळे या गावांचा कारभार वाऱ्यावर आहे. याचा कारणातून एखादी दुर्घटना घडून अपघात घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात असून महापालिकेचे अधिकारीही यावर स्पष्ट बोलण्यास तयार नाहीत.

# पाणीकपातीचे संकट लांबणीवर

## खडकवासला धरणसाखळीत अवघा साडेसहा टीएमसी पाणीसाठा : महापालिकेकडून जूनच्या पहिल्या आठवड्यात फेरआढावा

**पुणे | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत अवघा साडेसहा टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे पाऊस लांबल्यास पुढील काही महिन्यांत पाण्याची गंभीर स्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन धरणातील पाण्याचा आढावा शुक्रवारी महापालिकेत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत कपातीचा निर्णय पुढे ढकलण्यात आला आहे.



धरणात असलेले पाणी महापालिकेसाठी जुलैअखेरपर्यंत राखीव ठेवण्यात आले असल्याने तूर्तास गरज नसल्याचा निष्कर्ष काढण्यात आल्याने शहरावर असलेले पाणीकपातीचे संकट टळले आहे. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी बैठक बोलावली होती. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागास पाटबंधारे विभागाचे अधिकारी या वेळी उपस्थित होते.

धरणातील साठा पुरेसा?

या बैठकीत पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून खडकवासला धरणसाखळी प्रकल्पात ६.५० टीएमसी पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती देण्यात आली, तसेच पालखीसाठी अर्धा टीएमसी आणि १५ जुलैपर्यंत महापालिकेस आणखी साडेतीन टीएमसी पाणी शिल्लक ठेवला जाणार असल्याचे सांगण्यात आले. शेतीसाठी उन्हाळी आर्वतनाची मागणी असली, तरी नुकतेच शेतीसाठी देण्यात आलेले आवर्तन जादा दिवस दिल्याने तूर्तास शेतीसाठी पाण्याची गरज नसल्याचे पाटबंधारे विभागाने स्पष्ट केले.

त्यानुसार महापालिकेकडून सध्या असलेले पाणी पुरेसे असल्याने, तसेच शहरात एक दिवस पाणी बंद केल्यास पुढे तीन दिवस पाणीपुरवठा विस्कळित होतो. त्यामुळे आणखी दोन आठवडे कपात न करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्रशासकीय सूत्रांकडून सांगण्यात आले. या वेळी हवामान विभागाकडून मान्सून लवकर येण्याचे, तसेच चांगला पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविला असून त्यावरही चर्चा करण्यात आली.

**महापालिकेकडून नियोजनाची तयारी**

» पुणेकरांवरील पाणीकपात टळली असली, तरी महापालिकेने मात्र शहरातील पाणीकपातीच्या नियोजनाची तयारी सुरू केली आहे. गेल्या काही वर्षांत शहरात जून महिन्यात पावसाला सुरुवात झाली, तरी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयानंतरच धरणात पाणी वाढण्यास सुरुवात होते.

# नियम न मोडताच आल्या दंडाच्या पावत्या

## पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाकडे अवघ्या चार महिन्यात साडेआठ हजार जणांच्या तक्रारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाहतुकीच्या नियमांचे (RTO) उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कारवाईसाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची मदत घेऊन कारवाई केली जाते. मात्र, चुकीच्या पद्धतीने दंड ठोठावला जात असल्याच्या अनेक तक्रारी वाढल्या असून, पिंपरी- चिंचवडमध्ये मागील वर्षभरात सहा हजार ६७४ जणांनी तक्रारी नोंदवल्या आहेत. तर, यंदा जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यात एक हजार ८४८ जणांनी चुकीचे चलन पडल्याच्या विरोधात अर्ज दिला आहे.



वाहतुकीचे नियम न मोडता आलेल्या ई-चलनाच्या मेसेजमुळे वाहनचालकांचा गोंधळ उडताना दिसत आहे. वाहन क्रमांकावरील चुकीच्या, अर्धवट किंवा हेराफेरी केलेल्या क्रमांकामुळे चुकीचे ई-चलन जारी होत असल्याचे वाहतूक पोलिसांचे म्हणणे आहे. राज्यभरातील वाहतूक पोलिसांकडे ई-चलन संबंधित तक्रारी येण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढू लागले आहे.

पिंपरी- चिंचवडमध्ये सन २०२३ मध्ये ६ हजार ६६७४ जणांनी चुकीच्या चलन विरोधात तक्रारी दिल्या आहेत. तर, यंदा चार महिन्यात एक हजार ८४८ जणांनी वाहतूक विभागात धाव घेतल्याच्या नोंदी आहेत. वाहतूक विभागाने चुकीचे चलन खातरजमा करून ते रद्द करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे चुकीचे चलन पडल्यास घाबरून जाऊ नये, असे आवाहन वाहतूक विभागाकडून करण्यात आले आहे. चुकीच्या ई-चलनाचा मेसेज आल्यानंतर सर्वप्रथम वाहतूक विभागाशी संपर्क साधावा. आपण नियमभंग केला नाही, याबाबतच्या योग्य पुराव्यांसह तेथे तक्रार नोंदवावी. वाहतूक पोलिसांच्या नियंत्रण कक्षात या तक्रारी प्राप्त होतात. तक्रारीतील माहिती, फोटो अचूक असल्यास त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येते.

चुकीचे ई-चलन प्रकरणी पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेकडे २०२३ या वर्षभरात ६६७४ तक्रारी प्राप्त झाल्या. तर, यंदा जानेवारीमध्ये ते एप्रिलमध्ये १ हजार ८४८ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यातील विशेष म्हणजे वाहतूक विभागाने या सर्व तक्रारींचे निरसन केल्याची नोंद आहे. काही वाहनचालक ई-चलनाचा मेसेज आल्यानंतर वाहतूक पोलिसांकडे जातात. आपण नियम तोडलाच नाही, अशा आविर्भावात पोलिसांशी हुज्जत घालतात. त्यावेळी पोलीस चलन क्रमांकावरून सर्व माहिती काढतात. नियमभंग करतानाचे फोटो पुराव्यादाखल समोर ठेवतात. त्यानंतर मात्र नाठाळ चालक खजील होऊन काढता पाय घेतात.

### ऑनलाइन तक्रार सुविधा

» चुकीच्या ट्रॅफिक चलनाबाबत ऑनलाईन तक्रारीसाठी महाट्रॅफिक ॲप उपलब्ध आहे. चलन रद्द करण्यासाठी ॲपवर तक्रार नोंदवावी लागते. त्यानंतर तक्रार संबंधित शहरातील वाहतूक विभागाकडे प्राप्त होते. त्यांच्याकडून पडताळणी करून अहवाल सादर केला जातो. अहवालानुसार चलनाबाबत निर्णय घेतला जातो.

> वाहतुकीचे नियमभंग न करता मोबाईलवर ई-चलन आल्यास गोंधळून जाऊ नये. तत्काळ ऑनलाईन अथवा वाहतूक शाखेच्या नियंत्रण कक्षाकडे तक्रार नोंदवावी. आपल्याकडे असलेल्या पुराव्यांच्या आधारे चलन रद्द करण्यात येईल.
>
> **- विशाल गायकवाड, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड.**

# शहरातील होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडीट करा

## चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्यात वादळ, पाऊस, वाऱ्याने होर्डिंग कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्याकरिता शहरातील उभारण्यात आलेल्या होर्डिंग्जचे (जाहिरात फलक) स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची मागणी चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी केली आहे.



याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, शहरातील सर्व अनधिकृत व स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट (स्थिरता प्रमाणपत्र) न देणाऱ्या सर्व होर्डिंगवर जाहिरात फलकांवर तत्काळ कारवाई करावी व जाहिरात धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश संबंधित मनपा अधिकाऱ्यांना तत्काळ देण्यात यावेत.

उद्योगनगरीतील स्थापत्य विषयक लेखापरीक्षण न केलेले सर्व होर्डिंग्ज (जाहिरात फलक) काढून टाकावे तसेच अनधिकृत जाहिरात फलकांवर कठोर कारवाई करताना प्रमुख्याने धोकादायक, वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या जाहिरात फलकांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी आमदार जगताप यांनी लेखी पत्राद्वारे केली.

नुकत्याच मुंबई येथील घाटकोपर परिसरात होर्डिंग दुर्घटना झाली. त्यात निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे, हि खूप दुख:द व गंभीर बाब असून प्रशासनाच्या दुर्लक्ष व हलगर्जी पणामुळे हि घटना घडली आहे. याच धर्तीवर आपल्या पिंपरी-चिंचवड शहरात अनेक परवाना धारक व अनधिकृत होर्डिंग आहेत. पावसाळा देखील काही दिवसांवर आला असून, या पावसाळ्याच्या दिवसात वादळ व मुसळधार पावसाची शक्यता आहे. अशातच काही होर्डिंगमुळे दुर्घटना घडू नये त्यासाठी खबरदारी म्हणून संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरातील होर्डिंगचे सुरक्षेचा द्रुष्टीने स्ट्रक्चर ऑडीट करण्यात यावे, व दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी काटे यांनी केली आहे.

# अखेर महापालिकेच्या गेटवरील होर्डींग काढले

## महापालिकेच्या आकाश चिन्ह विभागाच्या परवानगीनेच ठेकेदाराने होर्डींग उभारल्याचा पीएमपी प्रशासनाचा दावा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिका आयुक्तांनी दिलेल्या आदेशाला केराची टोपली दाखवत महापालिकेच्या गेटवर होर्डींग उभारण्याचे काम केले जात होते. यावर प्रसारमाध्यमातून जोरदार टीका झाल्याने एक रात्रीत उभारण्यात आलेले होर्डींग काढून घेण्यात आले आहे. हे होर्डींग उभारण्यासाठी पीएमपीच्या ठेकेदाराने महापालिकेच्या आकाश चिन्ह विभागाची परवानगी घेतली होती. असा दावा पीएमपी प्रशासनाने सीविक मिररशी बोलताना केला आहे. तर महापालिका प्रशासनाने हात वर केले असून याला परवानगी पीएमपी प्रशासनानेच दिली असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे आता या होर्डींगची जबाबदारी कोणाची असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



महापालिका आयुक्तांनी शहरात वृक्षतोड करून उभारण्यात आलेली होर्डींग काढून टाकण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाला २४ तास उलटायच्या आताच महापालिकेच्या नवीन इमारतीच्या गेटसमोरच रस्त्यावर डिजिटल होर्डींग उभारले जात होते. विशेष म्हणजे चक्क वृक्षतोड करुन हे होर्डींग उभारण्यात येत होते. ही बाब लक्षात येताच महापालिका प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली. एकीकडे महापालिका आयुक्त शहरातील होर्डींगची पाहणी करत असताना दुसरीकडे आपल्याच दारात वृक्षतोड करुन उभारण्यात आलेले होर्डींग कसे दिसले नाही. असा प्रश्न पुणेकरांनी उपस्थित केला असून संताप व्यक्त केला आहे.

मुंबईत होर्डिंग कोसळून १६ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे राज्यात संतापाची लाट पसरली आहे. त्यामुळे राज्यातील सर्वच शहरातील होर्डींगचा आढावा घेण्यात येत आहे. पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले यांनी आकाशचिन्ह विभागाकडून होर्डींगचा आढावा घेतला. त्यावेळी वृक्षतोड करून होर्डिंग उभारण्यात आलेल्याची माहिती समोर आली होती. त्यावेळी असे होर्डींग काढून टाकण्याचे आदेश आयुक्तांनी दिले होते. महापालिकेच्या जागेतच हे होर्डींग उभारले जात असल्याची माहिती आकाशचिन्ह विभाग आणि ज्या विभागाच्या ताब्यात ही जागा आहे त्या विद्युत विभागालाही नव्हती. त्यामुळे या दोन्ही विभागांनी हात वर केले आहेत. त्यामुळे, एका बाजूला आयुक्त जाहिरात फलकांबाबत कारवाईचे आदेश देत असतानाच दुसऱ्या बाजूला महापालिकेच्या दारातच सुरू असलेला हा प्रकार चर्चेचा विषय ठरला आहे. तर, चक्क भर रस्त्यात ही परवानगी देण्यात आल्याने याबाबत उलट सूलट चर्चा सुरू झाल्या आहेत.

महापालिकेच्या नवीन विस्तारीत इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या समोरच महापालिकेने ई-वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारले आहे. याच ठिकाणी पीएमपीचे पास केंद्र आहे. या केंद्राच्या समोर आणि चार्जिंग स्टेशनच्या आवारात जाहिरात फलक लावण्यासाठी भला मोठे लोखंडी खांब उभारण्यात आला होता. त्यानंतर एका रात्रीत स्ट्रक्चर उभारण्यात आले होते. मात्र पुन्हा यावर टीका झाल्याने तत्काळ हे स्ट्रक्चर काढून घेण्यात आले. शहरात उभारण्यात आलेले होर्डींगच्या बाबत महापालिकेचे अधिकारी सोयीची भूमिका घेत असल्याचे समोर आले आहे.

### राज्यातलं वातावरण कसं असेल?

**» होर्डींगसाठी उभारण्यासाठी पीएमपी प्रशासनाकडून ठेका दिला जातो. ठेकेदाराला जागा निश्चित करुन दिले जाते. त्यानुसार संबंधित ठिकाणी होर्डींग उभारण्यासाठी ठेकेदार महापालिकेच्या आकाश चिन्ह विभागाकडून परवाना घेतो. त्यानंतरच हे होर्डींग उभारण्यात येते. पीएमपीने आता पर्यंत डेपो आणि बस स्थानकावर साधे १६ होर्डींग उभारले आहेत. त्याला महापालिकेने परवानगी दिलेली आहे. महापालिकेच्या मालकीच्या गेट समोरीलव जागेत होर्डींग उभारले जात होते. त्यासाठी ठेकेदाराने महापालिकेची परवानगी घेतली होती. परंतु ते आता काढून घेण्यात आले आहे, असे जनसंपर्क अधिकारी सतीश घाटे यांनी सांगितले.**

> महापालिकेच्या गेट समोरील होर्डींगला पीएमपी प्रशासनाने परवानगी दिलेली होती. परवानगी देताना हे होर्डिंग पीएमसी बस थांब्या लगत असल्याचा विचार करण्यात आला होता. परंतु त्यांनी जागा निश्चिती करून घेतलेले नव्हते. यामुळे आता हे होर्डिंग काढण्यात आलेले आहे.
>
> **- माधव जगताप, आकाश चिन्ह विभाग प्रमुख, पुणे महापालिका.**

# पुण्याहून कर्नाटकांत उंटांची तस्करी

## आठ उंटांना जीवदान : सामाजिक कार्यकर्त्यांचे प्रसंगावधान, सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

कर्नाटकमधील कत्तलखान्यासाठी पुण्यातून उंटांची तस्करी केली जात असल्याचा खळबळजनक प्रकार काही सामाजिक कार्यकर्त्यांनी उघडकीस आणला. रावेत येथून आठ उंट घेऊन कर्नाटककडे निघालेला ट्रक पोलिसांच्या मदतीने पकडण्यात आला. याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अरुणकुमार चिनाप्पा (२८, रा. कुदपल्ली, जिल्हा कृष्णागिरी, कर्नाटक) आणि लखन जाधव ( ३०, रा. करपटे वस्ती रोड, काळेवाडी फाटा, वाकड) अशी अटक आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी कृष्णा सातपुते ( २४, रा. वारजे) यांनी फिर्याद दिली आहे.

चिनाप्पा हा ट्रकचालक असून लखन हा उंट सवारीचे काम करतो. फिर्यादी हे सामाजिक कार्यकर्ते आहेत. “रावेत येथून एका ट्रकमध्ये काही उंट निर्दयतेने कोंबण्यात आले आहेत. त्यांना कत्तलीसाठी कर्नाटकात नेण्यात येणार आहेत,’ अशी माहिती मानद पशूकल्याण अधिकारी शिवशंकर स्वामी यांनी माहिती दिली.

त्यानंतर सातपुते आणि त्यांचे मित्र प्रसाद दुडे, आशुतोष मारणे, अजय भंडारी, सागर धिडे हे मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर वारजे भागात थांबले होते. रात्री पावणेदहाच्या सुमारास ट्रक चांदणी चौकाकडून येणारा ट्रक त्यांनी पाहिला. त्यांनी पाठलाग केला आणि वडगाव पुलाजवळ ट्रक थांबविण्यात आला.

ट्रकचालकाची चौकशी केली. सोबतच ट्रकची तपासणी केली असता, त्यामध्ये आठ उंट एकत्रित बांधून ठेवण्यात आल्याचे दिसले. या ट्रकला चारही बाजूंनी ताडपत्री लावून उंट झाकण्यात आलेले होते.

उंटांचे पाय आणि तोंड निर्दयतेने बांधण्यात आलेले होते. ट्रकमध्ये चारापाण्याची व्यवस्था नव्हती. या उंटांना जखमा झाल्या होत्या. कार्यकर्त्यांनी ११२ नंबरला दूरध्वनी करुन पोलिसांची मदत मागितली. पोलिसांनी ट्रक आणि उंट ताब्यात घेतले. या उंटांना पांजरपोळ येथे ठेवण्यात आले आहे. कार्यकर्त्यांना शिवशंकर स्वामी आणि ॲड. आशिष बारीक यांनी मार्गदर्शन केले.